म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६६२८

# राजसी

वसंत बापट

REFBK-0026434
REFBK-0026434

संदर्भ
काव्य
२६२४
२६४३४
१८।५।९७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे

दा. क्र. २६२४
२६४३४
१८।५।९७

राजसी



**वसंत बापट यांची पुस्तके**

बिजली १९५२, १९६२, १९६४, १९७९, सेतु १९५७, १९६२, १९७४, १९९०, अकरावी दिशा १९६२, सकीना १९७२, मानसी १९७७, १९९१, प्रवासाच्या कविता १९८२, शिंग फुंकिले रणी १९८२, १९९१, मेघहृदय १९८८, शूर मर्दाचा पोवाडा १९८८, तेजसी १९९१, राजसी १९९१

अबडक तबडक १९८३, चंगा मंगा १९८३, आम्ही १९८५

बालगोविंद १९६५

बारा गावचं पाणी १९६६, जिंकुनि मरणाला १९८१, विसाजीपंताची वीस कलमी बखर १९८७, तौलनिक साहित्याभ्यास १९८१

# राजसी

वसंत बापट

REFBK-0026434

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन ३८४

पहिली आवृत्ती
२५ जुलै १९९१

© १९९१, वसंत बापट

मुखपृष्ठ, रेखाटणे
वासंती मुझुमदार

किंमत पन्नास रुपये

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मंगेश आणि विंदा
यांना प्रेमपूर्वक...

## थोडे प्रास्ताविक

एकोणीसशे बाहत्तरमध्ये 'सकीना' हा माझा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतरच्या अठरा वर्षांत माझी अनेक पुस्तके प्रकाशित झाली असली तरी वेळोवेळी प्रसिद्ध झालेल्या स्फुट कवितांचा नवा संग्रह प्रकाशित होऊ शकला नव्हता. या वर्षी मात्र 'साधना प्रकाशन'ने 'तेजसी' हा संग्रह सिद्ध केला आणि 'मौज प्रकाशन गृहा'ने 'राजसी'. हे दोन संग्रह एका दृष्टीने आवळेजावळे असले तरी त्यांची प्रकृती भिन्न भिन्न आहे. कवितांचा संग्रह प्रसिद्ध करताना त्यांची विशिष्ट भावस्थिती आणि तिच्यामुळे होणारा आविष्कारावरील परिणाम लक्षात घेणे श्रेयस्कर आहे, असे मला वाटते. दोन संग्रह वेगळे करण्यामागे माझा हाच दृष्टिकोन आहे. इतकेच नव्हे तर 'राजसी' या संग्रहातही तीन स्वाभाविक विभाग आहेत, ते अशाच हेतूने केलेले आहेत. 'राजसच्या कविता' या व्यक्तिगत भावजीवनातून जन्म घेणाऱ्या आहेत. 'संवत्सर' या दुसऱ्या विभागात ज्या कवितांचा अंतर्भाव केला आहे, त्यांचा अंतःस्थ भाव सृष्टीच्या कौतुकाचा आहे. जीवनाच्या चक्राकार गतीचा प्रत्यय ऋतुचक्राच्या फेऱ्यात सर्वांत उत्कटपणे येतो. कोणत्या तरी गूढ प्रेरणेने, नियत गतीने ऋतूंचे निःशब्द परिवर्तन चालू असते. या सत्याचे संवेदनशील मनाने कौतुक करण्याचा छंद माझ्या मनाला पूर्वीपासून आहे, हे याआधीच्या माझ्या काव्यातही सहज आढळून येईल. या विभागात याच छंदाचे एकवट दर्शन घडवण्याचा माझा हेतू आहे. 'राजसी'मधील तिसऱ्या विभागावर मात्र, त्यातील कवितांचा अमुक एक असा विशिष्ट स्वभाव नसल्यामुळे, कोणतीही नाममुद्रा मी उठवलेली नाही. वेळोवेळी सकारण अथवा

अकारण मनाच्या पृष्ठभागावर उमटलेले रंगतरंग एकत्र गुंफले आहेत एवढेच. म्हणून त्या विभागाला 'अबोली आणि इतर कविता' असे उपशीर्षक मला पुरेसे वाटले. काव्य वाचकांच्या हाती सोपवले की 'इदं न मम' असे म्हणून कवीने निवांत असावे, हे बरे. परंतु 'राजसी'त उपविभाग का केले ते सांगावेसे वाटले. कोणतीही कविता केव्हाही वाचावी हे मान्यच आहे. पण विशिष्ट हेतूने केलेले हे विभाग सूक्ष्म प्राणतत्त्वाच्या आधाराने केले आहेत, एवढेच निदर्शनास आणणे अगत्याचे ठरते.

मी चालढकल करण्यात वाकबगार. मुलखाचा आळशी. महत्त्वाच्या गोष्टींबाबतही अव्यवस्थित आणि गहाळ. त्यामुळे डॉ० संगीता बापट यांना संग्रहाची जुळवाजुळव करताना खूप मेहनत पडली. मंगेश पाडगावकर यांची माझी मैत्री म्हणजे माझ्या दृष्टीने आयुष्यात लाभलेला एक भाग्ययोगच. मुद्रणप्रत सिद्ध करण्यासाठी त्यांनीही कष्ट घेतले. वासंती मुझुमदार यांच्या ठायी कवितारती आणि सौंदर्यदृष्टी या उभय गुणांचा संगम झाला आहे. या संग्रहाचे देखणे मुखपृष्ठ ही त्यांचीच किमया. 'मौज'च्या सर्व संबंधित मित्रांनी पुस्तक 'निके' निघावे या सदिच्छेने सर्व प्रकारे लालनपालन केले. या सर्व अनुग्रहांविषयी कृतज्ञता व्यक्त करताना सतत जाणवणारी एक भावना म्हणजे 'हे पुस्तक निघावे हे तो श्रीपूंची इच्छा.' आणि त्यांचे आभार मानायला मात्र शब्द नाहीत किंवा असले तर दुबळे आहेत.

— वसंत बापट

## अनुक्रम

### राजसच्या कविता


राजस ३
तू असतेस तेव्हा... ४
निदान एक कर ५
उषास्वप्न ६
तू ७
हसणे म्हणजे... ८
सांगणे ९
शांती १०
जत्रा ११
उरतंच काय? १२
भाग्य माझे १३
आता पुन्हा न भेटी १४
प्रीती १५
तिची चर्या तिचे चरित १६
नशीब म्हणून १७
स्वप्न १८
प्रमाथी इंद्रिये १९
भास २०
समाप्ती २१
सजा २२
संपले रे त्राण २३


### संवत्सर



संवत्सर २७
बाळ प्रथम हासले २८
आवळेजावळे २९
ग्रीष्म ३०
उजाड ३१
पर्जन्यसूक्त ३२
नैॠत्येचा वारा ३३
आषाढस्य प्रथम दिवसे ३४
राजा पर्जन्या! ३५
श्रावण आला रे ३६
तृप्ती! ३७
मोरच मोर ३८
आश्वासन ४०
आश्विनाचा साज ४१
अंधारच नसता तर ४२
दिवे ४३
पाखरू ४४
पक्षी आणा रे ४५
चाहूल ४६
समजदार माघ ४७
शिशिरातला शेवटला सूर्यास्त ४८

मारवा ४९
तळहाताएवढा निळा तुकडा ५०
गुढी ५१
वसंतखूळ ५२
बुलबुल ५३
फाग ५४
शिरीष ५५
कयास ५६
अंगणातल्या बागेमधे ५७
शाप ५८
चक्राकार ५९

अबोली आणि इतर कविता

अबोली ६३
रंगारी ६५
सौंदर्यवेध ६६
मैफल ६७
सावळा चंद्र राधेचा ७१
तो आणि मी ७२
याचनासूक्त ७३
नवे पुरुषसूक्त ७४
तो दळभद्री चेहरा ७६
फुलन ७७
कबर ७८
नमो बुद्धाय ७९
उपगुप्त ८०
संध्याछाया ८२
सबूर ८४
गाणं ८६
चित्रपट ८७
ऋणाईत ८८
अस्ताचल ८९

# राजसच्या कविता



## राजस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २६५२४ / २६४३४ / १८।५६९
मुंबई शाखा (स्थळ प्रत)

राजस, राजस, राजस,
तुझंच नाव जपतो राजस!
स्वल्पविरामाशिवाय मोहिनीमंत्रासारखं...
टकाटका डोळ्यांनी
तुझंच नाव कोरतो मी राजस!

उत्तररात्री राजस, प्रत्येक क्षणावरती
तुझ्या नावाचे राजस अवयव
दव होऊन ठिबकतात
माझ्या हटवादी सताड पापण्यांवरून!

आणि राजस, तुझ्या नावाचा
सोनटक्क्याचा गंध
आसमंत भरून वाहतो पहाटभर...

राजस, तुझं नाव उजाड सकाळी
उडून जातं ना दाणापाण्यासाठी,
तेव्हा भुकेला राहतो मी राजस!

कधी गुल्मोहर...उन्हामधील...
कधी कडुनिंब...भळाभळा मोहोर ढाळतो:
तुझंच नाव तेव्हा राजस,
रंगभर, सुवासभर...

काळोखात ना राजस, तुझं नाव
जिथं तिथं उमटतं तेव्हा
निःशब्दातून शब्द येतो
राजस, राजस, राजस...

## तू असतेस तेव्हा...

तू असतेस तेव्हा तसा प्रश्न नसतो :
तेव्हा असते सोबत हवापाण्याची
सोबत असते फितीवरल्या गाण्याची
शिळोप्याच्या गप्पाटप्पा, वादावादी,
त्याच वेळी टपकलेले दुसरे नादी...
तासा दोन तासांचा तर असतो सवाल!
हवालदिल होण्यासारखं असतंच काय?
कॉफी करण्यात दहा मिंटं सहज जातात,
उभयपक्षी गृहीत असतात शिष्टाचार,
म्हणजे तशी गुंतागुंत नसते फार!
तू असतेस, मी असतो, ते असतात,
तू हसतेस, मी हसतो, ते हसतात...

तू नसतेस तेव्हा होतेस मस्तक सबंध,
आणि मी? शुद्ध देह! केवळ कबंध!

## निदान एक कर

हजारांच्या समुदायात डोळेभेट झालीच तर
दिसेल-न-दिसेलसं मंदमंद हसतेस तू
अमोरसमोर आपणच दोघेजण उरल्यावर
दिसेल-न-दिसेलसं हसलो, तर रुसतेस तू

समजूतदार चेहऱ्यानं मला आवरून धरताना
नसांमधल्या सतारींवर गवसणीच घालतेस तू
तुला उत्तर द्यावं म्हणून मीही मौन धरल्यावर
सोबत नसल्यासारखी विमनस्क चालतेस तू

जगावं की मरावं? असले प्रश्न सोपे असतात
उत्कट जगताना आवर घालणं फार कठीण
तुला जमत असेलही असा जगावेगळा योग
काय करू! झालो आहे अविचारात मी प्रवीण!

युगं युगं झाली तरी तेच धडे देशील का?
विकारांच्या वादळात एकदा तरी येशील का?
तू निदान एक करशील? माझे पंख जळल्यावरती
धरणीवर मी कोसळताना कुशीमधे घेशील का?

## उषास्वप्न

उषेचे रंग आकाशात उसळावे,
समोर असावं सावरीचं झाड
निष्पर्ण उदासीन :
तसा मी उभा आहे तुझ्या जीवनासमोर !

करुणेनं मन भरून आलं तर
मेंदी माखलेल्या हातांचे ठसे
ठेव असे देहभर :
होऊ दे भास पालवी फुटल्याचा !

मग आहेच दुपारचा कोरडा उजेड,
आहेच चौफेर फुटलेला फुफाटा :
जळून जातील बरं
वेडी वेडी स्वप्नं आणि आठवणी !

शेवटी, काळरात्रीच्या गडद काळोखात
मी मुकाट उभा राहीन,
पाहीन तेव्हा
अदृष्ट पटावरती अज्ञात उषा-स्वप्न !

# तू

सुस्नात सकाळी सोनटक्क्याचा गाभा तू,
आळसावल्या दुपारी वाळ्याच्या वासाची
मावळत्या संध्येची सुरंगी आभा तू,
कुंद रात्री नव्या चंद्राच्या भासाची!

रजपूत चित्रामधली अरळतरळ रागिणी,
अघळपघळ किमोनोत मुलखाहून वेगळी तू
झाकली न झाकलेली सोनसळा नागिणी,
तंग चिटामधली गुल्छडीच कवळी तू!

अशी पाहू, तशी पाहू, कशीकशी पाहू तुला
सुळसुळीत मासोळीची छबी तरी घेऊ कशी
चांदण्यात द्रवणारी स्फटिकाची पुतळी तू,
मनात जिथे मावत नाहीस, हातामधे ठेवू कशी!

## हसणे म्हणजे...

हसतेस तेव्हा
तू अलीकडे हसतच नाहीस
उगीच बहाणा करू नकोस!

हसणं म्हणजे काय?
केवळ जिवणीची हालचाल?
सुरकुत्यांची अदलाबदल?
नुसती रोशनी? मांडावळ?
नुसती गोड दिसणावळ?

तू खरीखुरी हसतेस तेव्हा
तुझ्या अंतर्यामातून
एक प्रकाशाचा अंकुर
सरसरून वर उसळतो,
डोळ्यांच्या काठांवर दुभंग होतो,
चंद्रज्योती फुटतात,
आणि माझ्या मनाच्या काळोख्या गुंफेत
मरण-सावल्यांची मिथुनशिल्पं होतात!

## सांगणे

एक सांगणे :
अनोळखीशी येउ नको,
ठेवणीतले
हासू उधळत राहु नको!
भेटीनंतर
निरोप घेउन जाताना,
फुलांसारखे
खुडून डोळे नेउ नको!

कलहांतरिता
असल्याऐशी दिसू नको,
जुना जिव्हाळा
सरल्याऐशी रुसू नको,
इतरजनांच्या
नजरा चुकवुन बघताना,
डोळ्यांमधुनी
हृदयापावत घुसू नको!

जुळले नाही
चित्र, पुन्हा ते जुळेल का?
फुलले नाही
फूल, पुन्हा ते फुलेल का?
सूर वेगळा
दोघांचाही असताना,
विस्कटलेली
मैफल आता खुलेल का?

## शांती

तिला वाटत होतं :
कसा आपला झळझळीत साजशृंगार!
मला दिसत होतं
तिचं स्फटिकनग्न तान्हुलं शरीर!

वाऱ्यावर झुलणाऱ्या धुरासारखी
तरळ वाकणं तिच्या देहाची,
समशीतोष्ण सुंदर काया,
उभार प्रकाश, खोल छाया,
भुजमूलांशी जास्वंदीची फुले,
बावरल्या बाहूंचे रेशिमझुले!

फिटल्या आहेत तिच्या
कांचनकाचोळीच्या गाठी,
सुटले आहेत विभ्रमांचे चित्रबंध :
आता ती झाली आहे
तिची तिला सामोरी,
आणि मी? केवळ आरसा, साक्षीपुरता!

शहारलेली शुभ्र कबुतरं
मला देत आहेत तृप्त, अथांग शांती!
आहेत माझ्या तळव्यांची द्राक्षपानं
तिच्या केवळ विसाव्यापुरती,
अर्थात हे तिला माहीत नाही!

## जत्रा

पहा ऐलपैल हाट, कसा झगमग थाट,
            किती चलाख हिसाब
कशी घोंगावते गर्दी, उभे हुन्नराचे दर्दी,
            कलाकुशल कसाब
ऐका घोषणांचा घोष, कसा चाले कंठशोष,
            मतामतांचे दलाल!
साऱ्या देवळांच्या दारी, मुक्ती द्यावयाला चारी
            उभे पुजारी कलाल!

चला, घरी जाऊ राणी, नको डोळां आणू पाणी,
            तेही विकत घेतील!
तुला हासता बघून, कोणी टिपण साधून
            तुझा फोटो काढतील!
चल शोधूनिया पाहे, कुठे हरवला आहे
            गर्द आदिम अंधार
जिथे मनमुक्त श्वास, एकमेकांचा विश्वास
            नाही मिळत उधार!

## उरतंच काय?

स्वप्नं पहायचा चष्मा फोडून टाकलास,
आता उरला भकास भूगोल!
हरवून जायला जागा लागते,
हरखून जायला वेडेपण!
कोणीही कोणीकडेही जावं?
आणि कोणाहीबरोबर?
अशा वेळी यात्रा घडली तरी
पुण्य लागतं थोडंच!

सुंदर पहाताना, मधुर ऐकताना
(कालिदास म्हणतो) हुरहूर लागते
गतजन्मातले वज्रलेप भाव
जागे होऊन!
एका जन्मातच दोन अवतार घेतले
की दुसरा पहिल्याला शाप देतो!
मग उरतंच काय?
निरर्थकाच्या वैराणातलं भ्रमण
आणि निःशब्द पश्चात्ताप!

## भाग्य माझे

सांग कोणी या जिवाला धुंद केले ?
तूच आता दारही मज बंद केले !

एकदा दुनियेत मी मशहूर होतो
पाय ठेवावा तिथे मी शूर होतो
पंडितांच्या जिंकल्या होत्या सभा मी
आज तो रस्त्याकडेला कां उभा मी ?

चांदण्यांची एकदा हर रात होती
चुंबनांची एकदा बरसात होती
भाग्य माझे — शापही वरदान व्हावा
हे जिणे सरल्यावरी सन्मान व्हावा !

वेदनांचे मी बसंती छंद केले
तूच आता दारही मज बंद केले !

## आता पुन्हा न भेटी

आता पुन्हा न भेटी, झाले असे दुरावे,
डोळ्यांमधील पाणी डोळ्यांत सावरावे!

ओझे असह्य होता विजनी निघून जावे,
भूमीवरी निजावे, आभाळ पांघरावे!

एकेक आठवावे, डोळे मिटून घ्यावे,
मज मीच धीर द्यावा, मज मीच आवरावे!

झाल्या उजाड बागा, गेले उडून रावे,
गेला वसंत गेला, त्याला न आठवावे!

## प्रीती

प्रीती तिची निराळी समजून घ्यायची
वाढेल ओढ म्हणुनी जवळी न यायची!

हसतील चारचौघे, करतील लोक निंदा...
जरि दृष्टिभेट झाली, नाही हसायची!

चातुर्य राजसेचे...सबबी तिच्या हजारो
एकान्त टाळण्याला गर्दीत जायची!

स्पर्शास जेथ बंदी तेथे मिठी कशाची?
अगदी हवेतलाही पापा न द्यायची!

मीही निमूट पाळी जरि सर्व कायदे हे
चुकता कधी जरासा शिक्षा करायची!

परि मीच या व्यथेने अभिमानतप्त होता,
होऊन अंध वर्षा ती कोसळायची!

## तिची चर्या तिचे चरित

तिची चर्या तिचे चरित, त्यांत नाही लहानमोठे
तिचे हसणे हेच असणे, दुसरा अर्थ आहे कोठे?

तिच्या भाळी तिचा छंद असतो कसा खळखळ वहात
फूलमोकळा जीव तिचा, गंध नाही लपून रहात

तिची गणिते सरळसोपी, व्यस्तबिस्त बात नाही
साऱ्या गाठी सुटण्यासाठी एक गाठ आत नाही

कावाबिवा कुछ नाही, लढेल किंवा गळ्यात पडेल
कधी काही दुखलेखुपले, झऱ्यासारखी स्वच्छ रडेल

अजूनदिखिल लहान आहे: खेळणे तिला अवघे जग
चांदण्याची चिमणी वेल: तिला ठाऊक नाही धग

उन्हा, उन्हा! सांगतो पुन्हा, तिच्या वाटे जाऊ नको
पावसा, पावसा येऊ नको, तिला धका लावू नको

आभाळ अगदी काळेभोर, ससाण्यांची दाटी किती
राहू द्या रे घरट्यामधेच माझी भोळी मैनावती!

## नशीब म्हणून

दोनचार तरी पावसाळे असे गेले पाठोपाठ
आतल्या आत झड लागून पापण्या भरत काठोकाठ

सकाळ होता लख्ख लौकिक ऊन यायचं हसत हसत
विस्कटलेले मेघ मात्र डोळ्यांवरून हलत नसत

छातीमधे गडगडायचं, मी भ्यायचा मृगासारखा,
साडेतीन हात आसऱ्यालाही कसा झालो होतो पारखा

अकालीच वादळ उठलं: ठेवून गेलं निष्ठुर खुणा
जखमेवरती फुंकर घाला अशी भीक मागू कुणा?

शिरावरचं छत्र फाटून निखाऱ्यांची पेरणी झाली
नशीब म्हणून उशीरानं त्यांच्यामधून फुलं आली!

## स्वप्न

श्रावण शुद्ध प्रतिपदा, पहाटेचा कवळा प्रहर,
आषाढानं पसवलेल्या प्राजक्ताला आला बहर

भारामुळे उभं झाड भुईपावत खाली झुकलं,
एक फूल नदीत पडलं, प्रवाहातच वाट चुकलं!

वाट चुकलं आणि गेलं आडोशाला वहात वहात,
पहात नाही कोणी म्हणून जाईजुई होत्या नहात!

...लहानपणचं स्वप्न बरं...आणि जेव्हा जाग आली,
प्राजक्ताच्या सुगंधाची लाट मला बुडवून गेली!

उरले प्रहर आळसावलेले, अर्धी जाग अर्धी निद्रा,
वठलेल्या या खोडावर प्राजक्ताच्या चुंबनमुद्रा!

## प्रमाथी इंद्रिये

तळ्यात हिनकळणाऱ्या प्रतिबिंबासारखी
तुझी तेढीमेढी प्रतिमा
पाणावलेल्या डोळ्यांत थरथरत राहते!

कानांत भरभरून आहे स्वरसुंदर संगीत
तरी पडसाद येतात
अखेरच्या निरोपाच्या जडशीळ शब्दांचे!

पॅरिसच्या उंची सुगंधांचा क्लोरोफॉर्म
अनेक वेळा देऊनही
शुद्ध जात नाही तुझ्या कौमार्यगंधाची!

देहाच्या रंध्रारंध्रात चेतलेली
स्पर्शाची शीतळ आग
अजूनदेखील धुमसतच राहिली आहे!

आलटूनपालटून आपण चाखलेल्या
खट्ट्यामीठ्या गोळीची चव
जीभ विसरून जायला तयार नाही!

बुद्धीला असतात अनंत बहुशाखा,
मन मुर्दाड (किंवा कोडगं)...
इंद्रिये मात्र प्रमाथी ती प्रमाथीच!

## भास

संध्याकाळी किनाऱ्यावर एकाएकी झाला भास:
कोण आलं...कोण गेलं? कोणीच नाही जवळपास?
कुठून आली...कुठे गेली? मी पाहिली एवढं खरं
असं येणं, असं जाणं तिला दिसलं नाही बरं!

चुळबुळणाऱ्या लाटांचा जिना उतरत उतरत आली
रेतीवरती पाउलखुणा न ठेवता परत गेली
'थांब थांब' म्हणेस्तोवर कशी दिसेनाशी झाली
गुल्बशीच्या मावळतीवर आली जास्वंदीची लाली!

पुस्तक मिटून ठेवल्यावरती चांगलं का हे पुन्हा येणं?
तेव्हा वचन दिलं होतं, पुढील जन्मी देईन देणं!
आयुष्याच्या क्षितिजावर अंधारात बुडले रंग
कशासाठी, कशासाठी आता असा तपोभंग?

समुद्राच्या लाटा झेलत जेव्हा दोघे भिजलो होतो
ओल्याचिंब देहांनीच पेटलो होतो, विझलो होतो!
आता असे कोरडे...जसं जळण्यासाठी उत्सुक सरण
निमित्ताला ठिणगी हवी! एवढ्याकरता दिलं स्मरण?

## समाप्ती

क्षण दोन क्षण भेट घेऊन
तडकाफडकी नको जाऊस
जसा वैशाखातला पाऊस!

नजरानजर होते तोच
दुसरीकडे नजर जाते
काळजात घुसते तल्लख पाते!

निष्ठुर तर तू आहेसच!
न बोलता जखम करून
पुन्हा फुंकर घालतेस दुरून!

धावाधाव संपत आली
आता निवांत बसू या
अहेतूकच हसू या!

उरलेसुरले रहस्य तू
अजून जपतेस सावधपणे
मलाच माझे माहीत उणे!

दिवस मावळतीवर कलला
अर्धेमुर्धेच उरले बिंब
कथासमाप्तीचे टिंब!

## सजा

जागेचा लळा लागलेल्या अगतिक मांजरासारखे
माझे ओढाळ पाय
पुन्हा पुन्हा शोधतात तरी काय?

पुरलेला खजिना सापडण्याच्या आशेनं
माझे डोळे बुभुक्षित, अधाशी
काय धुंडाळतात जिन्याच्या तळाशी?

केव्हाच कोसळला आहे तो जुना इमला
तरी कोणाची अधुरी वासना रेंगाळते आहे?
अंध वटवाघूळ होऊन लोंबकळते आहे?

बहुधा भासच झाला असावा...
एक समुत्सुक नागीण सळसळत गेली
उन्हाच्या रंगाची तकतकीत कात लेऊन आली!

मला वाटलं,
कटवाल्या कट्यारींनी मला केव्हाच काटलं
नसताना कोणताच गुन्हा!
अन् सजा अपुरी म्हणून
मला खेचून आणतात इकडे पुन्हा पुन्हा!

## संपले रे त्राण

विझत जाणारी ही दिवली,
इवली फुंकरही तिला नाहीच सोसायची!
जेव्हा उपेक्षेनं दिला मला एकांतवास,
निःश्वास टाकायचीसुद्धा होती चोरी!


उभ्या आयुष्याची होळी पेटली आधी
आणि भेटली वैशाखवणव्याची ज्वाळा,
तेव्हाही झाली होती
एका अबलेच्या बळाची अग्निपरीक्षा!

सयांनी शृंगार केले, आरास मांडली,
चढले त्यांचे हिरवे डोहाळे मांडवांवर,
तेव्हा माझ्या विजनात
मी ओढत राहिले माझी जपमाळ!

आता अंतर्बाह्य घनघटा झेपावल्यावर,
सुटल्यावर नैऋत्येचा सुगंधी वारा,
जाळलेल्या जमिनीतून
लवलवताहेत अंकुरांचे जन्मसोहाळे!

आता संपले रे त्राण
प्राणपाखराचे!

संवत्सर



## संवत्सर

असे कसे तरि संवत्सर हे!
कळीकळीतुन फुलते फूल्
फुलाफुलाला फळचाहूल्
राख फासता आभाळाने भुई घालते त्याला भूल्!

असे कसे तरि संवत्सर हे!
काळबावडी काठावर्
बारा फेरे राहटावर्
पाणी शेंदा शंभरदा ते जिरून जाते पाटावर्!

असे कसे तरि संवत्सर हे!
सारे सरती सोहाळे
हाती उरती कोहाळे
या धरतीची हौस फिटेना पुन्हा लागती डोहाळे!

असे कसे तरि संवत्सर हे!
कोण चालवी घाणा हा
अंधा बैल पुराणा हा
शून्यामधुनी तेल काढतो तेली कोण दिवाणा हा?

## बाळ प्रथम हासले

नवे नवल गे झाले, आज राम जल्मा आले बाई तिन्ही भुवनांत!
वारा वाहे झुळझुळा, रामाचा ग खुळखुळा वाजे बाभूळबनात

गेले शिशिर हेमंत, आला साजण वसंत, सारे पुरले डोहाळे
घननीळाचा प्रकाश, त्याने रंगले आकाश, दाही दिशांत सोहाळे

रामजल्माचा प्रहर, आला आंब्याला मोहर, भिजे मधामधे माती
न ही लिंबाची पालवी, राम आईला बोलवी त्याच्या चिमणुल्या हाती

शेत राईचे तबक, लेणी सोन्याची सुबक, संगे रंगीत अंगडी
खुळ्या झुळुकांसंगती वेली झुलती झुकती घेती लोळणफुगडी

फांदीफांदीची वेलांटी, वरी अबोली कोरांटी, लाट रंगांची फुटली
लाट रंगांची फुटली, लाख पिसोळी उठली, आली कुठून कुठली

गंधभुलीचं ग रान, जाता भ्रमरांचं भान दोघे डोळ्यांत बसले
कोकिळांनो, बाइयांनो! सांगा सर्वांना सयांनो, बाळ प्रथम हासले

राम हासले भवनी, राम हासले भुवनी, झाला आनंदीआनंद
आत त्रैलोक्याचा राणा, असा विश्वाचा पाळणा, झुले निरालंब मंद

## आवळेजावळे

आवळी जावळी छबी मधुमाधवांची
लक्ष्मणासंगे जशी मूर्ती राघवाची
माथ्यावर कर ठेवी विश्वाचा ग मित्र
देह जसे तापलेले बाई ताम्रपत्र!

जनकाने घातलेला मांडव आभाळी
अशोकाच्या पालवीचे तोरण झळाळी
वळिवाच्या विजेपरी शिवाचे धनुष्य
कडकड शब्द होता दिशा निर्मनुष्य!

पाउले उंचावी, हाती घेई वनमाळा
डोळियांच्या अंजुळीत भरी घननीळा
दिशांतून गर्जिन्नला वाद्यांचा गजर
धरत्रीची आभाळाची नजरानजर!

संशय फिटला, आता अंतर्पाट कुठे?
धरत्रीच्या अंगी झर्र रोमांच ग उठे!
वैशाखाच्या वेदीवर झाले स्वयंवर,
भूमीच्या लेकीला भेटे सूर्याचा कुंवर!

## ग्रीष्म

कसा ग्रीष्माचा कडाखा, आग आग रानोमाळ
त्यात अकस्मात आला कसा पाऊस दयाळ

धुंद वावटळ आली, गेला उडून पाचोळा,
तीव्र तिरप्या धारेचा घुसे जमिनीत फाळ

वीज वीज धार झाली, धार धार झाली वीज,
शरीरांच्या चिर्गुटांचा कोणी करावा सांभाळ ?

ऊर धपापे ग्रीष्माचा, वर्षा वेडीपिशी झाली
त्याला ठाऊक नव्हता तिचा आवेग वेल्हाळ

कळ सुखाची उठता, कोणी कोणा सावरावे ?
काय एका क्षणासाठी उभ्या आयुष्याचा खेळ ?

झाला सर्वस्वसोहळा, सुख मावेना मावेना,
तिच्या डोळ्यांत कोसळे त्याच्या डोळ्यांचे आभाळ

गेला ओसंडून पूर, झाला रिता रिता माळ,
नदी दूर दूर गेली, उरे काठावर गाळ

## उजाड

खुळी विलग पाखरे, नभ अथांग डोहापरी
भकास तरु नागवा, मुळि न पान देहावरी
भुताट मशिदीवरी घुमट भग्न अर्धा दिसे
पिशाचघटिकेमधे सकल रान वेडेपिसे

निठूर निवडुंग त्यामधुन धावती धावरी
रवंथ करिता मधे बिचकती गुरे बावरी
उजाड विहिरीमधे जरठ वाघळांची सभा
मधेच टिटवी उडे चिरत जाय काळ्या नभा

कुठे घुबड ओरडे, दुरुन येत कोल्हेकुई
क्षणात कशि कापते थरथरा मनाची भुई

## पर्जन्यसूक्त

पश्चिम क्षितिजावरून झेपावत आहेत
प्रमत्त काळेकरडे बैल अंगघसणी करीत!
कधी फोडतात डरकाळ्या रणदुंदुभीसारख्या,
कधी चालते कामी पुंगवांची घशातच गुरगुर,
अस्ताचलाला मस्तवाल ढुशा देत
उकरतात शिंगांनी गुलालाचे डोंगर,
सर्वाधिक उंडारण्याची होड घेऊन कसे
उडताहेत चौखूर, शेपट्या उंचावून!

कपिला वसुंधरा थरथरत उभी आहे
सभय उत्सुकतेने वळूंच्या झुंडीसमोर:
टवकारलेले कान, फूत्कारणारे नासाग्र,
आणि अवघ्या देहाची त्यांच्यासाठी ओंजळ!
रोम रोम तिचा सोनेरी सूर होतो,
आतुर डोळे तिचे निर्वाणीच्या प्रार्थनेचे:
निर्दय दयाघना...माझे ऐकू नका फार,
दुर्दम्य सामर्थ्याचा घडवा मला साक्षात्कार!

नागमोडी विजेसारखे पुंगवांचे सत्त्व उडेल
मुसळधार अंध धुंद शिळंधार पाऊस पडेल
निवलेल्या डोळ्यांमधून वात्सल्याची आशा झरेल
आळसावलेल्या देहामधे अपरंपार सूख भरेल
जिथे जिथे जागा मिळेल तिथे तिथे बीज रुजेल
पानपान, फूलफूल हिरव्या रंगामधे भिजेल
तेव्हा आणि फक्त तेव्हा पूर्ततेचा दिवस येईल
विराट पर्जन्यसूक्ताची सांगता संपूर्ण होईल!

## नैऋत्येचा वारा

सुटला नैऋत्येचा वारा
गरजत चमकत येतिल आता पहिल्या पाउसधारा

श्याम दयाघन अपुल्या चरणी
उद्धरील ही शापित धरणी
निर्मल ओल्या वातावरणी गातिल खग मल्हारा

भरुनि वाहतिल ओढे खळखळ
गाइगुरांची सरेल तळमळ
शुष्क जाहल्या तृणबीजांतुन फुटेल आज धुमारा

तहानलेली शेते वंचित
पुलकित होतिल फळता संचित
अवकाळाच्या अंधाराला फुटेल सोनकिनारा

## आषाढस्य प्रथम दिवसे

आषाढाच्या पहिल्या दिवशी
भिजून गेली चिंब धरित्री!
(कैक दिसांनी न्हाउन माखुन
प्रसन्न झाली तुटकी छत्री!)

स्वर्गधरेचे मीलन झाले:
सांगत फिरतो गंधित वारा!
(जाने दो जी! मारो गोली
आज कचेरिस बुट्टी मारा!!)

हिरवळ हसली खडकांवरुनी
झरे लागले थक्‌थय् नाचू!
(गरम भज्यांसह चहा भुरकुनी
आपण फिल्मी मासिक वाचू!!)

आषाढाच्या पहिल्या दिवशी
जलधारांना कशास भेटा?
(खरे सांगु का, कवितेतच तो
निसर्ग सुंदर दिसतो बेटा!!)

## राजा पर्जन्या!

साता नक्षत्रीं, नक्षत्रीं, पाउस झाल्यावर्ती
हिर्वा शिणगार, शिणगार, लेउन आली धर्ती

धुर्कट डोंगर, डोंगर, लखपक् झाले सर्वे
कर्वतकातळ, कातळ, झाले हिर्वे हिर्वे

काटेकर्वंदी, कर्वंदी, मख्मालीच्या झाल्या
बोरी-बाभूळी, बाभूळी, केसांवर्नं न्हाल्या

खड्डे-खाचरी, खाचरी, साचुन् भर्लं पाणी
धर्लं आभाळ, आभाळ, झेलुन ऐन्यावाणी

रानी विंचर्ल्या, विंचर्ल्या, बेणी अंकुर्लेली
आल्या रंगाला, रंगाला, गोकर्णीच्या वेली

वास्राम्हस्रांना, म्हस्रांना, बख्खळ ओला चारा
कवळ्या कर्डांच्या, कर्डांच्या, कानीं शिर्ला वारा

राजा पर्जन्या, पर्जन्या, माय्ंदाळ.माया वोती
दे रे सुगीलाऽ, सुगीलाऽ, दानं पोती पोती

जर का न्हाई तू, न्हाई तू, वावर औंदा शिपलं
तर मग जल्माचं, जल्माचं, भांडण आपलंतुपलं

## श्रावण आला रे

सरसर श्रावण आला रे, श्रावण आला रंगाला
पाउस पागल झाला रे, झोंबे ओल्या अंगाला!

भोळी माती दरवळली
डोंगरछाती हिरवळली
श्रीरंगाची शोभा रे, आभाळाच्या भिंगाला!

अल्लड थिल्लर पाण्याशी
खेळे चिमणी राण्याशी
खुळा पारवा घुमला रे, साद घालतो संगाला!

फुलाफुलावर रंग चढे
गंध उसळला चोहिकडे
कुणी केतकी चळली रे, लावी वेड भुजंगाला!

उभी किशोरी दारात
खेळत रेशिमधारांत
ओलेत्या पदराने रे, चळ भरला निःसंगाला!

कोठे पाउस? ऊन कुठे?
नवथर कवळी धून उठे
मल्हाराच्या संगे रे, रंग भरे सारंगाला!

## तृप्ती !

जळ तुडुंब भरता पात्री
आनंद नदीच्या गात्री
संतोष दिसे धरतीचा
वेलींच्या हसऱ्या नेत्री !

ही हिरवी हिरवी राने,
ही रसरसलेली पाने...

या कणांतुनी मातीच्या
रुजतात चिमुकले थेंब
दर्पणात जागोजागी
सूर्याचे हळवे बिंब !

ही हिरवी हिरवी राने,
ही रसरसलेली पाने...

## मोरच मोर

मोर आले आहेत आभाळ भरून:
त्यांचे निळेजांभळे कापुस पिसारे
झुलत आहेत नैर्ऋत्येच्या सजल वाऱ्यांवर!
जेव्हा अमावास्येच्या जांभुळबनांतून
त्यांचे थवे आले पहाटे पहाटे
आषाढाच्या पहिल्या दिवशी,
क्षणभर
उगवता सूर्यही कुसुंबी मोर झाला!

रानारानातले हिरवे हिरवे मोर
लचकत लचकत मुरडताहेत
फिस्कारलेले पिसारे पसरून!
मोरपिसांवरचे लाखो बदामी डोळे
थरथरताहेत आनंदाच्या कल्पनेने!
अणकुचिदार वाऱ्यांच्या फणीने
पुन्हा पुन्हा विंचरलेले शिखातुरे
विस्कटले आहेत बेहोष मोरांनी!

प्रत्येक नववधूच्या पावलोपावली
उजळताहेत राजवर्खी बुंदांचे मोर,
मोर नाचताहेत हिरव्या चुड्यांच्या तालावर,
जरतारी पदराचे सोंग घेऊन
फडफडताहेत त्यांचे रंगश्रीमंत पिसारे...
ते पाहता पाहताना
कर्त्यासवरत्या वृद्ध मातांच्या पापण्यांवर
अलगद उतरताहेत मोर!

मोर आभाळात, सागरात,
मोर रानावनांत, डोंगरांत,
मोर तनामनांत, कुंवार गाण्यांत,
मोर पापणी पापणी पाण्यात,
मोर गवतांच्या तुऱ्यांत, थुईथुई झऱ्यांत,
आज काळ्या मातीच्या भोळ्या डोळ्यांवर
स्वप्न तरळते आहे
सोनपिकांच्या तजेलदार मोरतुऱ्यांचे!

## आश्वासन

आश्विनाचा पहिला श्वास आत आत ओढून घ्यावा
आश्विनाचा रेशिमशेला प्राणांभवती वेढून घ्यावा
नवा सूर्य भरून घ्यावा पाउसओल्या डोळ्यांमधे
नवे धान ठेवून द्यावे जुन्या भिजल्या वाळ्यामधे

आश्विनाला कायाकल्प कौमार्याचा येतो वास
कडू आठव उडून जातात माधुर्याचा होता भास
फुलण्यासाठी उलू लागतात कमलकंदांमधल्या पेशी
डबक्याकाठी डुलू लागतात नवी गवते सोनकेशी

भाद्रपदात चिखलामधे ऋतुचक्र रुतून बसते
आश्विनाच्या आश्वासक श्वासासरशी फिरू लागते !

## आश्विनाचा साज

रंऽग सांगे रानाचा
गंऽध बोले धानाचा
आश्विन आला आश्विन आला
निरोप हिरव्या पानाचा!

पूऽर सरला पाण्याचा
सूऽर भरला गाण्याचा
नूऽर अचानक उजळुन गेला
गर्द मळ्याच्या राण्याचा!

मस्त झुळझुळ वाऱ्याची
लख्ख लुकलुक ताऱ्यांची
फुलाफुलांच्या अंगांवरती
शाऽल धूसर पाऱ्याची!

साऽज आश्विन राजाचा
थाऽट गाजावाजाचा
स्वच्छ आकाशातुन पाउस
आऽज कवळ्या तेजाचा!

## अंधारच नसता तर

अंधारच नसता तर केवढा घात झाला असता
असंख्य तारे मुळात नजरेलाही पडले नसते
काही ठळक दिसले असते तेही किती केविलवाणे
आकाशाच्या अंगावरती कोडासारखे ठिपके नुसते

आश्विनातल्या अवसेलाच आपल्याला ही समज येते
काळोखाच्या काळीमधून प्रकाशाचे अंकुर फुटतात
उपड्या काळ्या समुद्राचा अथांग तळ शोधीत
आपल्या बुडत्या बोटीमधून नवे अग्निबाण सुटतात

तात्पर्य काय, कुंती म्हणाली : काळोख हवा अंतर्बाही
त्याच्यावाचून कृष्णा, तुझ्या दर्शनाची आशा नाही!

## दिवे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. २६२४
२६१३४
१५।१२।६७

दिवे लागले हारीने
        साऱ्या महानगरात,
राजमार्गावरी दिवे,
        दिवे राजमंदिरात
लाख तारकांचे दिवे
        काळ्याभोर अंबरात,
दिवे अत्तरगंधांचे
        कंचनींच्या झुंबरांत!

हेलकावे खात जाती
        दिवे नदीच्या पात्रात,
दिवे प्रकाशात न्हाती
        एकमेकांच्या मेळात!
किर्र काळोख्या रानात,
        चिंब भिजल्या पानांत
काजव्यांच्या दीपकळ्या
        पेटतात विझतात

अवसेच्या काळ्या रात्री
        दिवे दिवे असंख्यात
तरी अंधार सरेना
        एका एकाकी मनात
एक जपलेले आहे
        निरांजन गाभाऱ्यात :
कार्तिकाच्या पहाटेला...
        त्याची तेवेल का वात?

## पाखरू

हरवून शीळ आले रानात पाखरू
वेडे उदास झाले रानात पाखरू!

कळपात सोबत्यांच्या चाले अखंड चर्चा
का एकटे उडाले रानात पाखरू?

येता उनाड वारे गातात कंठ सारे
मौनात कां बुडाले रानात पाखरू?

फुलवूनिया पिसारे केले कुणी इशारे?
कां हे जरा न हाले रानात पाखरू?

हेमन्तपावलाने गळतात लाख पाने,
हुंकार कां न बोले रानात पाखरू?

कोठे वसंत आहे हे वाट पाहताहे,
माझे दुखावलेले रानात पाखरू!

## पक्षी आणा रे

झाली पानझड रानी
झाडे उभी मोनी मोनी
उभे सांगाडे असे
सारा सुकला पाचोळा
झाला पायातळी गोळा
पक्षी येतील कसे!

कशी जगतील झाडे,
नाही बागडत लाडे
जिथे एक चिमणी?
सात सुरांवीण गाणे
तशी पक्ष्यांवीण राने
पक्षी आणा रे कुणी!

कधी अवसेपुनवे
इथे लागून वणवे
सारी राख व्हायची!
कधी येईल वादळ
कधी कोसळेल जळ
किती वाट पाह्यची!

म्हणे फुटेल पालवी
राने होतील हिरवी
सारे होईल नवे,
तेव्हा लागुनीया ओढ
गाणी गात गोड गोड
त्यांचे येतील थवे!

## चाहूल

याचि देही याचि डोळां
आपली पानगळ सोशीत
झाडं उभी आहेत धीरोदात्त!
अटळ असलेलं निष्ठुरपण
ती स्वीकारतात समंजसपणे,
किंवा कदाचित असंही असेल:
त्यांच्या मिटल्या डोळ्यांना
दिसू लागत असतील
नवे रंगीन फुलोरे,
आणि त्यांना येतही असेल
आंब्यावरच्या मोहोरातून
भविष्याचं सुगंधी आश्वासन!

आपणही पहात आहोत
आपल्या विराट बोधिवृक्षाची पाने
एक एक करून गळताना!
पण आपली संवेदनाच बोथट:
तिला जाणवत नाहीत जराही
अनागत सौंदर्याचे उन्मेष
की येत नाही
सुवासिक चाहूल
येणाऱ्या वसंताच्या निःश्वासांची!

तरीही म्हणू या (सालाबादप्रमाणे):
हे शिशिरान्तक वसंता, तू ये,
आम्ही तुझं स्वागत करू!

## समजदार माघ

कितो वसंत, किती पावसाळे, सुगीचे दिवस
ओलांडून उतरलो समजदार माघामधे!
बसंती शेला, नसांतले नूपुर उतरून ठेवले
पूर ओसरल्यावर पाणी प्रसन्न झाले

आता दिशा मौनात आहेत आकाशभरून
आणि मीही धाबळीमधे गुरफटलेला!
आठवणींच्या शेकोटीत चुरूचुरू जळतो आहे
चलाख शब्दांचा पिका-पिवळा पाचोळा!

उशीरा उगवलेल्या पिंपळावरच्या पाखरांनो
अंगणामधले उरले गणंग घेऊन जा!

## शिशिरातला शेवटला सूर्यास्त

शिशिरातला शेवटला सूर्यास्त झाला तेव्हा
शिवेवरचे शिवालय अधिकच काळवंडले
निष्पर्ण सांगाडे निःशब्द झाले होतेच,
आता काटे-झुडुपांनीही माना टाकल्या!
संपले...सर्व काही संपले...याचा निर्वाळा
जुन्या जाणत्या तटभिंतींनी दिला
खचलेल्या गढीने समजूतदार सुस्कारा टाकला
तोही धुरळा अवसेच्या काळोखात मिसळला!

दिगंबर दारिद्र्याच्या लाजेमधे चूर होऊन
सारी सृष्टीच थिजून बसली संवत्सर संपताना!

## मारवा

आज चोरपाउली
ये हवेत गारवा
पंख मिटुन आपुले
मूक होय पारवा

काजळून मंदिरे
मौनमग्न कां उभी?
पर्णहीन वृक्ष हे
दीठ लावती नभी

पंख हालवीत हा
स्तब्ध जाय कारवा
रे समूर्त जाहला
आज खिन्न मारवा!

## तळहाताएवढा निळा तुकडा

हिवाळ्यातल्या पक्ष्यांच्या थव्यांबरोबर
स्वप्ने केव्हाच उडून गेली आहेत...

उतरली आहेत सोनेरी उन्हे
पापण्यांच्या छपरांवरून...

शेवटच्या फुलाचे थंडगार चुंबन घेतले
तेव्हाच सीलबंद झाले गाणारे ओठ...

आता मिनारांत शिरू नका,
ते डळमळले आहेत...

आपल्या अर्भकांच्या शापांनी
क्षितिजे काळवंडली आहेत...

अज्ञात धरणीकंपाने
भोवंडलेले डोंगर पाहिलेत ना ?

उंच उंच वाढणाऱ्या भिंतींत
अदृष्ट गुदमरते आहे...

आभाळ तर संपलेच आहे,
तळहाताएवढा निळा तुकडा कुठे दिसतो आहे का ?

## गुढी

पहाटे पहाटे चैत्राच्या पहिल्या प्रहरी
एक अवखळ झुळूक आली अबोली रंगाची!
मृत्यूनं भारलेल्या घरकुलाच्या अंगणामधे
पाहुणी अजाण पोर येते पैंजण वाजवीत,
देते आव्हान दुःखाला, निराशेला,
निव्वळ आपल्या निरागस नाचरेपणाने...
तस्सं झालं. नकळत उचलल्या सर्व माना...
आभाळात, अर्भकाच्या तोंडवळ्याचं सूर्यबिंब
आणि एका...निदान एका...शेलाट्या बुंध्यावर
अबोली गुढी अबोल विजयवार्तेची!

## वसंतखूळ

अस्थिपंजर रान आता दक्षिणेला झुकलं आहे,
फूल फूल जळून गेलं, पानपान सुकलं आहे!
तेढ्यामेढ्या बोटांवरची नखं पार झडून गेली,
खांद्यावरती खेळायची ती चिटपाखरं उडून गेली!

थंडगार, बोचरा वारा अंगभर खिळे ठोकतो,
काळजामधल्या काजळगुहेत रात्रभर कोण खोकतो?
रात्र काय, दिवस काय, पुटपुट करीत जातात घटका,
देवा नारायणा वणव्या! तूच आता कर सुटका!

ही मोहाची झाडं पहा...चोवीस तास लाडीगोडी!
अमलताश अन् बहाव्याची बहुधा जमली आहे जोडी!
खरं खोटं कोण जाणे, एक अफवा उठली आहे,
काटेसावरी जिकडे तिकडे वार्ता देत सुटली आहे:

विलायतेच्या वाऱ्यावरून नवं पाखरू आलं आहे,
म्हणे वठल्या खोडांनाही वसंतखूळ झालं आहे!

## बुलबुल

सैबेरियामधला बुलबुल
थंडीनेच घायाळ झाला
दक्षिणमुखी वाऱ्यावरून
माझ्या बागेमधे आला

आंब्यावरती मोहोर होता
पळस लालेलाल सारे
सुगंधाने आळसावलेले
वहात होते मंद वारे

सुखावलेले खुळे पाखरू
इथे रमले चार घटका
परत घरी जाता जाता
लावुन गेले मला चटका

पुढल्या वर्षी वसंतात
बुलबुल दुसऱ्या देशी जाईल
इथे असा गारठा पडेल...
बाग सैबेरिया होईल!

## फाग

फाग खेळतो चराचरातुन अभिनव रंगविलास

लाल, केशरी, उजळ, मनोहर
रंगा आले शत गुल्मोहर,
अमलताशचे झुबे खुलवती अमल नील गगनास

धनगर्दीने शिरीष फुलले
लाख तुरे झुळकींवर झुलले
मध्यान्हीच्या ज्वाळांवरती तरळे मंद सुवास

शेवंतीवर सुवर्णशोभा
करि जास्वंदी उघडा गाभा
रंगे कुंपणकोरांटीवर नवरंगांचा रास

रतन अबोली बरळत बोले
देइ सुरंगी अंगा झोले
सायंकाळी गुलाल उधळित भिडत धरा गगनास

## शिरीष

माझं प्रदीर्घ संवत्सर आता फाल्गुनात सरेल
त्याची काही फिकीर नाही, चैत्रात शिरीष गच्च भरेल!
हिरव्याकंच पानांमधून गुलूकेसरी फुलं हसतील,
दाट दाट छायेमधे विरळ विरळ गंध फिरेल!

शिरीषा, तू भूमीमधून कसकसून रस घ्यावास,
नितळ निळ्या आकाशातून स्वच्छ मोकळा प्रकाश प्यावास!
ग्रीष्मामधे फुफाट्यावर अनवाण्यांची पावलं पोळतील,
तेव्हा तुझ्या सावलीमधे तूच त्यांना गारवा द्यावास!

असं व्रत घेताक्षणी तुझा जन्म माझा होतो,
फाल्गुनातला युवराज असा चैत्रामधे राजा होतो!
एक मात्र लक्षात ठेव, कवचकुंडल अंगचं हवं,
स्वयंभू जे चक्रवर्ती त्यांचा गाजावाजा होतो!

## कयास

आज पहाटे आभाळवाटेवरून
एक धूमकेतू भारद्वाज उतरला
काटेसावरीच्या निष्पर्ण उंबऱ्यावर
निःशब्द न्याहाळीत धुक्याचा किनारा!
सावरीच्या कानात काहीतरी कुजबुजला,
तिचं मन तरंगलं पिसासारखं हल्लक :
आता ती कात टाकीलसं वाटतं!

शिरीषाच्या हिरव्या छपरांवरचे पोपट
सूर्योदयासरशी थव्यानं उडून गेले,
(माघातला मोहोर त्यांना सोसत नाही.)
आज पहिला तिरपा किरण वर्मी लागून
एक कोकीळ कुहू कुहू चीत्कारला...

पक्ष्यांनाच उमगतात वृक्षांची इंगितं,
वृक्षांनाच समजतात पक्ष्यांची हृद्गतं –

तरी माझा भाबडा कयास आहे :
वसंत आता फारसा दूर नसावा!

## अंगणातल्या बागेमधे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
रा. क्र. २६५२४ / २६५३४
१५।१।९९
ठाणे शाखा (स्थल)

या फुलातून त्या फुलात वसंताची घेता चाहूल
परागांत रंगत गेलं पिवळ्या पाकोळीचं पाऊल!
जास्वंदीच्या फांदीवर तिच्यासाठी होता झुला,
ती म्हणाली, "माझ्यासंगे झोका घेशील माझ्या फुला?"

एका वनदेवतेला...एकदा गंधभूल जडली,
पहाटेला दवामधे तिची नाजुक पावलं पडली!
प्राजक्ताचे केशरी देठ तिच्या पायाखाली आले,
पावलांवरच्या मेंदीमुळे कसे लालीलाल झाले!

एकदा एका वेलीवरती पहिलीवहिली आली कळी,
तिला वाटलं वाऱ्यामुळे कळी पडेल पायातळी!
दोन इवल्या पानांची तिने आपली ओंजळ केली,
कोणीतरी बिचारीची पानांसकट कळी नेली!

## शाप

जातं वर्ष, येतं वर्ष,
म्हणजे नेमकं होतं काय?
काळ धावत असला तरी
त्याचे वाजत नाहीत पाय!

संथ लयीत कोण गातं?
कसा चुकत नाही ताल?
पहिले पाढे पंचावन
चालू असतात सालोसाल!

फिरतात ऋतू चक्राकार
फिरतात ग्रह आणि तारे
सारथ्यावाचून फिरतो रथ
सूर्यासकट अंध सारे!

माणसाच्याच आयुष्याला
अशांतीचा कसा शाप?
धडधडणाऱ्या धमनीमधे
सम चुकते आपोआप!

## चक्राकार

विश्वात सारंच फिरत असतं अंध-अटळ चक्राकार :
कौमार-यौवन-जरेसह जन्ममरण-येरझार,
ग्रहगोलांचे नियत फेरे, समुद्राचे चढउतार,
धमनीमधला रक्तप्रवाह, लडयदार ऋतुसंहार,
सूर्याची आभासयात्रा, चंद्राचे अंशावतार,
अज्ञानाच्या आनंदात हे ईश्वरी चमत्कार

एका पाटीला शिवून सूर्य घेत असतो माघार
संक्रांतीच्या सणासाठी एवढाच आपला शास्त्राधार!

शतकांच्या अवजड बेड्या ज्या दिवशी तुटून पडतील
नव्या उभारीने गरूड नव्या अस्मानात उडतील
पिंजरे तोडून टाकण्याची पाखरांना हिंमत येईल
आणि प्रत्येक गळा जेव्हा न पढलेलं गाणं गाईल
ऊर्मी उतट होऊन जेव्हा तरारलेला मोहर दिसेल...
तेव्हाच खऱ्या संक्रमणाचा एक सुंदर उत्सव असेल!

# अबोली आणि इतर कविता



## अबोली

केळी-कर्दळींच्यामधे रहाटाचा आड
बाजूलाच नाजूक उंच रायआवळीचं झाड
ती यायची आडावर हातात घेऊन घडा
तेव्हा मी झाडावर टपटप पाडीत सडा
तिचा परकर घोळाचा, पोलका सैल कोरा,
नुकतं नाक टोचलं तिथे एक काळा दोरा
भुरभुरणारे भुरके केस जरा सारखे करून
ओणव्यानंच ओच्यामधे आवळे घ्यायची भरून
आता सगळे फिके रंग...स्मरण गेलं बुजून
तिचा कुंवार अंगगंध उरला आहे अजून!

जेमतेम चवदाची ती पोरसवदा
एकाएकी मोठी झाली, पोक्त झाली
काय घडलं कुणालाच कळलं नाही,
तेव्हाच तर त्या अबोलीची वाचा गेली
तिला जडला मुलखावेगळा एक छंद:
कातरवेळी विहिरीकाठी बसायची
पापणीपाशी थबकलेला एकेक आसू
आवळ्यासारखा पाण्यात पडता हसायची!
कुणास ठाऊक का रडली, किती रडली,
पुढे तिची पापणी कायम कोरडी पडली!

मांडवावरती चढवलेली नाजूक वेल
मुळापाशी डंख होऊन सुकून जावी
तशी तिच्या यौवनाला दृष्ट लागली,
नेमकी काय कथा...असेल तिलाच ठावी!
प्रत्येक रात्र दिवसामधे विरघळताना
राजकुमार स्वप्नी यावा असं वय!

हिचे मात्र रात्रंदिवस सताड डोळे
कायम वस्तीसाठी आलं कसलं भय?
        नंतर शहाणी झाल्यावरती काय घडलं?
        तिचे डोळे पहात फक्त पलीकडलं!

कपाळीचे कुंकू        पहाटेला दिले
कंकण वाहिले        सूर्यबिंबा

कार्तिकस्नानाची        फुंकुनिया धुनी
प्रपंचामधुनी        दूर झाली

एकेका श्वासाने        सुकविले ओठ
समिधेचे काष्ठ        देह केला

भगवे नेसली        वैतरणेकाठी
अंतर्बाह्य गाठी        तोडूनिया

पैलतीरावरी        लावुनिया दिठी
कैवल्याची मठी        मेळविली

तीन तपांनंतर जेव्हा मी आलो या नदीकाठी,
प्राक्तनातल्या स्मृतीसारखी तू भेटलीस कशासाठी?
आयुष्याला चूड लावून का म्हणून जळत राहिलीस?
एकदा सांगशील, पहाटेला कोणती भुतावळ पाहिलीस?
वाटा वेगळ्या झाल्या म्हणून गेलो होतो दूर निघून
कधी वाटते, जोग घेतलास माझी खूप वाट बघून
जगाकडे पाठ फिरवून प्रलय कधी टळत नाही
कुणावरती सूड घेतलास तेच मला कळत नाही
        मला हवं माझं सांत्वन, ठेव हातावरती हात
        आश्वासन दे...माझ्यामुळे केला नाहीस आत्मघात!

# रंगारी

मन रंगारी रंगारी!

अरूपाला देई रूप,
अधांतरी बांधी स्तूप,
आणि आपुले स्वरूप
असंख्याने गुणाकारी!

आशेत की निराशेत,
बोले रंगांच्या भाषेत,
रंग-रेषा समवेत
पियू आणि प्राणेश्वरी!

रंग जडाची चेतना,
रंग आनंद, यातना,
जीवनाच्या सायंतना
रंग सोनेरी किनारी!

## सौंदर्यवेध

समजू लागतं तेव्हापासून
माणूस प्रेमात पडत असतो,
भाग्ययोग हुकल्यावरती
आतल्या आत रडत बसतो!

नसांमधून रक्त जेव्हा
उकळी आल्यासारखं वाहतं,
झिंदाबाद कैफ चढतो,
त्याचं काय बाकी राहतं?

मेंदूमधला कॉम्प्युटर
जोवर काम चोख करतो
वेदान्ताचा काथ्याकूट
तोवर महत्त्वाचा ठरतो!

सुंदरतेचा वेध मात्र
साथ कधी सोडत नाही
चैतन्याच्या अंतापर्यंत
भावबंध तोडत नाही

हेच माझं भागधेय:
रंग, रेषा, ताल, सूर
अगदी शीव ओलांडेतो
संगे येतील दूरदूर!

निसर्गाचे सारे विलास,
निर्गुण संगीताचा प्रहर...
मी सुकून गेलो तरी
यांचा सुकणार नाहीं बहर!

## मैफल

### १ भूप

आळोखे पिळोखे देत
जसा सरसरून दरवळतो धूप
भूप थेट तसाच अवतरला...

कातीव रेशिमलड उलगडताना
निःशब्द पिंजली जाते धाग्याधाग्यांनी
तसे अलगविलग निळे कोवळे सूर...

दिवेलागण तशी झालेली होती
पण लख्ख प्रकाश पडला तो मात्र
धैवतावरून षड्जावर घेतलेल्या झेपेने...

हे कोवळे कोवळे सूर
ही प्रसन्न प्रकाशाची रात्र...
अवघ्या राजसभेत तोही एक भूपच जसा!

### २ ठुमरी

तृप्तीच्या भावनेने तो सुखावला, शहारला
पहिल्या चोरट्या चुंबनाच्या आठवणीने
तो आतल्या आत हसला...
तिच्या कृतक कोपाने उठवलेले रोमांच
आता लडिवाळ स्वरांचे अंकुर झाले...
तिच्या वळेसरासारखी मींड घेत
तो हळुवारपणे शिरला वृंदावनात...
रतिमंथर पावलांवर पायल रुमझुमावे
तशी ठुमरी अवतरली...

आता त्याचे स्वर म्हणजे
आपल्या डुचमळत्या घागरीतून
तिने त्याच्यावर उडवलेले तुषार!

**३ बागेश्री**
श्रावणाची हलकी सर झेलून
जमीन तरतरलेली
वर चांदण्यासारखे माफक ऊन
सोनटिकलीची गवतफुले वाऱ्यावर झुलणारी
दाटीवाटी फुलांचा दिमाख मिरवणारे
शेवंतीचे जर्द ताटवे...

सफाईने पायऱ्या उतरून
बागेत आलेल्या श्यामलेचा झोकनोक
तो जुईफुलांचा सोज्वळ सुगंध
तो मुक्त उडणारा शुभ्र तलम पदर
यौवनफुल्ल बागेश्रीचे चित्र रंगवीत
त्याने साद घातली, 'सखी मन लागे ना'

**४ शंकरा**
गंधगर्भ पहाटे
तो निघाला शंकराच्या दर्शनाला!
आकाशाला नुकतीच जाग येत होती
पहिल्या पहाटपक्ष्याच्या अस्फुट षड्जाची!
खुल्या राजरस्त्यावरून
तो वळला नागमोडी बिदीमधे
प्राजक्तगंधार अंधारात टपटपली सरगमफुले...
हे तरी होतं कुठं त्याच्या लेखी?
त्याला ओढ केवळ गांभाऱ्याची!
आभाळाची कड थोडी उजळ झाली,
उत्कट कंठामधले तंबोरे झणाणले,
आणि त्याची लय वाढली दुगुण अवसानात...

चढण अवघड:
गंधार ते पंचमाची!
जवळपास अशक्यच पावलं अडखळल्याशिवाय!
तोच उतार, परतताना सुखाचा!
शंकराच्या मंदिराचं शिखर त्याला दिसलं मात्र:
तार षड्जाकडे झेपावल्यागत पुढे झाला!
निष्पाप सूर्याचे जास्वंदीचे भाबडे हात
सुवर्णकळसाशी पूजारंभी खेळत होते...
तो दाराशी रेंगाळला, पायरीवर सात फुलं ठेवली,
तीन स्वरांचे बिल्वदल सांभाळीत
दीपांकुर प्रकाशात
पिंडीजवळ उभा राहिला!
झांजरला...झपाटला...
मिटलेल्या पापण्यांपुढून
निळ्याजांभळ्या नागरेषा
फणा काढीत मिरवत गेल्या!
शिवोऽहं, शिवोऽहं, शिवोऽहम्, म्हणाला
एकाएकी बंद झालं बुद्धीचं महाद्वार,
कोण म्हणालं शिवोऽहम् कळेना,
फक्त जाणवलं:
अनाहूत प्रकाशानं उजळला गाभारा!
जुळलेले हात आणि तो सबंध जुळला होता,
शब्दांच्या डोंगरामागं उगवला कोवळा ॐकार
अन् त्याला गवसला अनाहताचा मूलकंद
बावीस अंकुरांनी रोमांचित झालेला!

**५ भैरवी**

जेव्हा सुखाची सय असते, ते हरवल्यावरची
जेव्हा दुःखाची सल होते मखमलीसारखी,
तेव्हा पापणी ओलावते, आसू झरत मात्र नाही,
त्या क्षणांच्या संधिप्रकाशात अवतरते
भगवी भैरवी...

तिचे मुख असते झाकलेले तिच्याच केसांनी.
आता जराही धसमुसळा धिटावा नको.
पण हळुवार हातांनी हनुवटी उचलली
आणि थोपटले आंजारगोंजारून
तरी ती उन्मळून कोसळून बिलगते...

अशा वेळी सूर मागे मुरडून विरतात,
मैफल सरते...कोणी बोलू नका, मौनालाच बोलू दे.

## सावळा चंद्र राधेचा

घनगर्द कदंबांखाली अंधारा आली भरती
सावळा चंद्र राधेचा मावळला यमुनेवरती

मालवून आली होती ती शेजघराच्या ज्योती
सावळा चंद्र राधेचा हरपला निळाइत मोती

का साद घातली त्याने? संकेत कशाला केला?
सावळा चंद्र राधेचा का चकवा देउन गेला?

वादळात वाहुन गेली मुरलीची मादक धून
सावळा चंद्र राधेचा कुणि नेला पदरातून?

झरलेला एकच आसू यमुनेवर उठवी लाटा
सावळा चंद्र राधेचा कायमचा चुकला वाटा

अंधार असा कोसळला राधेच्या देहावरुनी
सावळा चंद्र राधेचा उगवणार नाही फिरुनी...

## तो आणि मी

तो तारे मोजत असतो, मी मोजतो दिडकी दिडकी
त्याची दारे सताड उघडी, माझी बंद खिडकी खिडकी!

मला वाटते सूर्यचंद्र यंत्रचलित दिवाबत्ती
तो म्हणतो, क्षितिजावर रोज नवी वेलपत्ती!

त्याच्यापाशी प्रश्नच प्रश्न, माझ्यापाशी नसते उत्तर,
तो फुले वेचून आणतो, मी काढतो त्यांचे अत्तर!

रात्रंदिवस त्याचा आपला शब्दांसंगे चाले खेळ
मी तेव्हा निमूटपणे जमवत बसतो रोजचा मेळ!

तो तसा मी असा...आणि असे असलो तरी
गुण्यागोविंदाने दोघे नांदत आहो एका घरी!

कोण खरा, कोण खोटा, मूर्ती कोणती, कोणती छाया?
असला कज्जा सोडवताना सारा जन्म जाईल वाया!

एक खरे...मला माझ्या आरशामधे तोच दिसतो
आणि त्याच्या आरशात म्हणे त्याच्यासमोर मीच असतो!

याचनासूक्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २६५२४ २६४३४ ९८७८९
...शाखा (...)

हे भरदुपारी आसावरी आक्रोशणाऱ्या अन्नवाढावोमायिके!
हे गोळाभरभातार्थ-देहदानसमुदारे प्रकटपयोधरे नायिके!!
हे कॉफीहाउसफूटपाथस्थ पावलीद्यापावखाईन याचका!
हे ओबेरॉयशेरेटिनपाटकरा अर्धनग्न चर्यावाचका!!
हे मूकसत्याग्रहिन् फर्स्टक्लासडब्यानिकटच्या डबडेकऱ्या!
हे लग्नमंडपद्वारपाला पत्रावळ-चौथाई-वसूलकऱ्या!!
हे मोटरकाचस्वच्छीकरणार्थ धावणाऱ्या अर्धभुज भगवंता!
हे लंबोदर लक्तरांबर रिकेटसहोदर बालसंता!!
आम्ही महाप्रतिष्ठित मूल्यामूल्यविवेकतत्पर धर्मभास्कर
आम्ही अस्तरदार मनांचे निवडकऐक्या कानांचे अर्थतस्कर
आम्ही सकलचातुर्यकलाकोविद सोळभोग सोवळेश्वर
आम्ही प्रत्येक समस्या शास्त्रीयदृष्टिकोनान्तर्भूत-तोडगेश्वर
जन्मजात कवचकुंडलधर संतुष्टोदर गेंडाचर्मचिलखतचर
आम्ही प्रार्थितो न मारावे आम्हां जे मृतचि आहो निरंतर

## नवे पुरुषसूक्त

असंख्यशीर्षा पुरुषा,
असंख्य तुझे नेत्र, चरण आणि हात!
हे जनतात्मन् जनतादेही जनार्दना,
तूच करू शकतोस अभूतपूर्व अद्‌भुते...
फिरवू शकशील ऋतूंचे चक्र असंख्य हातांनी,
तुडवशील पर्वतप्राय मातीचा गारा
आपल्या असंख्य दणकट पायांखाली...
देशील आकार मनाजोगा घटाकाश-मठाकाशांना...
खुडून अमंगळ नक्षत्रके
आखून देशील नव्या कक्षा तारकाचक्रांना...
तुझ्या असंख्य लोचनांतला एक
काढील शोधून नवा ध्रुवतारा, नव्या जगासाठी!

त्याआधी लावून घे अवघ्या विश्वाच्या
एकनीडाची नव्याने व्यवस्था:
या घरट्यातली चिमणी पाखरे
व्याकुळ होणार नाहीत तहानभुकेने,
कोणीही आकाशाला भोसकणार नाही,
नाही अडवणार विमुक्त झुळुकांना,
विशाल अंगणात खेळतील बालके
हर रंगाची, पंचखंडांतली...
किंवा असे कर, हे असंख्यहस्ता!
तू पंचखंडेच शिवून टाक ना अखंड धाग्याने!

हे प्रतिसृष्टीच्या जनका, विश्वामित्रा,
कर नवा संवाद हटवादी नद्यांशी,
सांग त्यांना मर्यादेने वहायला,
घडव त्यांचा सुविहित संगम,
आणि त्यांच्या तीरा-तीरांवर

बहरू देत प्रसन्नतेचे हिरवे समुद्र!

हे असंख्यशीर्षा पुरुषा,
तुझी असंख्य मुखे एकच उद्‌घोष करोत
शांतिप्रेमाच्या अमोघ मंत्रपाठाचा...
तुझे अगणित चरण ज्या धरणीवर
ती धरणी सदैव सुफलित असो...
तुझे अगणित हात ज्या दशदिशांत
त्या प्रसन्न आणि निर्मळ असोत...
आणि तुझे अगणित पारदर्शी नेत्र
नव्या ज्ञानविज्ञानांचा वेध घेवोत!

या विराट विक्रमाच्या प्रस्थानापूर्वी
वारे सर्वत्र गाणी गात फिरोत...
झरे मोकळ्या मनाने झुळझुळ वाहोत...
वृक्षांना कुठारांचे भय नसो...
नसो भीती प्राणिमात्रांना अविचारी संहाराची...
जुळव चराचरांचा, जड-चैतन्यांचा मेळ
आणि मगच दे तू गती
रुतून बसलेल्या विश्वाकार रथचक्राला!

## तो दळभद्री चेहरा

कितीही टाळा,
भेटतोच तो दळभद्री चेहरा पुन्हापुन्हा!

त्याचं दारुण दर्शन दारूत बुडवा,
उडवा हजारो रुपये
बंदिस्त ऐषखान्याच्या रंगमहालात
तिथेही लकाकेल त्याचा बुभुक्षित डोळा
शीशमहालात मेणबत्ती पेटल्यागत!

कधी गळेल त्याची विषारी लाळ
फ्रेंच अनियन सूपच्या वाडग्यात

तुम्ही काढा एक दीर्घ वैमानिक यात्रा,
मात्रा चालणार नाही तरीदेखील...
तिथेही भिरंगणाऱ्या फाटक्या पतंगावरून
तो येतोच भेटीला!

तात्पर्य :
एकदा त्याने झपाटले की झपाटले!

## फुलन

लग्नाच्या दादल्याचा झिंजाडून दुखवटा
फुलनने फेकला ओरबाडून मुखवटा
सर्कन भिरकावला काडतुसी कमरबंद...
चामड्याचे जाकीट...करकचणारा दुपट्टा

दाखवीत ज्वानीची गडगंज कमाई
उत्सुक मांजरीची स्वरामधे नरमाई
टोळीच्या नायकाला गेली ती शरण
धार्जिणी गाय ती, तो क्रूर कसाई!

त्याच्या नजरेमधे हिंस्त्र हिंसक हपाप,
तिच्या छातीमधे धडकणारा धपाप
एकमेकां लुटल्यावर दोघेही लुटारू
अखेर विसावतील : अर्भके निष्पाप!

दरोगाजी! जाने दो! एकवार पकडू नका
बेडापार फुलनला बेडीमधे जखडू नका!

## कबर

वाळवंटामधले सोने ज्यांना दूरावरून दिसले,
धापा टाकत गेले आणि सोने वेचत बसले
दिपून गेल्या होत्या त्यांच्या डोळ्यांमधल्या भावल्या
तेव्हा त्यांना दिसल्या नाहीत श्वापदांच्या सावल्या!

एक दिवस निष्ठुर सूर्य ओकत राहिला आग
पायाखाली निखाऱ्यांच्या ठिणग्या जागोजाग
त्यांच्या डोळ्यांपुढे आले आपले पडके घर,
झाडीमधली वाडीवस्ती दर्याकाठावर!

जागे झाले जुने वास त्यांच्या प्राणांआत,
वाडगाभर तिखट कढी, थाळी भरून भात!
आता गळ्यात सोन्याची ही घालून जड सरी,
कोण कशी ओलांडणार अदृष्टाची दरी?

सगळे सोने वाटून टाकले वेड्या राजावाणी,
तरी कोणी देईल काय चुळका भरून पाणी?
कोणीतरी दुनियेला द्या रे आता खबर
सोन्यासाठी जगतात त्यांना सोन्याचीच कबर!

## नमो बुद्धाय

अपघातानं अकस्मात उसळलेला
हालाहलाचा संहारक कालमेघ
अजूनही तरंगतो आहे
जगाच्या थरथरणाऱ्या मस्तकावर!

मध्य आशियामधल्या यादवीची यज्ञकुंडं
आजही धगधगत आहेत,
करीत आहेत ज्वालांच्या जिव्हांनी
सहस्रांचा विधिवत् स्वाहाकार!

कुरुक्षेत्रावरची महायुद्धं आटोपली,
आटोपली नाहीत सौप्तिक पर्वं
अन् चोरट्या खुनी कडाबिनींचा
बेगुमान आत्मघातकी भडिमार!

आमच्या अंगणपरसांत पेटल्या आहेत
अंध, अभिमानी होळ्या...
टिपून घेत आहेत प्राणांचा मोतीचारा
खंजिरांच्या गिधाडचोची!

ॐ नमो बुद्धाय परमकारुणिकाय!

## उपगुप्त

अनुतप्त परतला संन्यासी उपगुप्त,
चवताळुन उठल्या सर्व वासना सुप्त
आजन्म ठेवले ठाणबंद जे अश्व
ते आज उधळले वृद्धपणी संतप्त

एकान्ततपस्या तीन तपांची सरली,
जडशीळ पावले मग माघारी फिरली
तारुण्य होमुनी जगला जगिं निष्प्रेम
निर्वाण कशाचे! केवळ तगमग उरली

पेटल्या अरण्याऐशा नगरी आला
तो भ्रांत मनाने बिदीबिदीतुन फिरला
फिरफिरुन मांडता हिशेब आयुष्याचा
बाकी न उरे हे पाहुनि तो बावरला

"अनुकरणशरण मी उगा भटकलो वाया,
मी समिधेसम का व्यर्थ सुकवली काया?
अस्वस्थ मनाला शांति कशी लाभावी?
मज कुठे मिळाली बोधितरूची छाया?"

तो मंजुळ पैंजण थिरकथिरकले दूर,
अन् तरळत आले मधुगीतापरि सूर
"हे संन्यासिन्! रे सुयोग्य घटिका आली!"
तनुवरी कोसळे स्पर्शसुखाचा पूर!

"हे उपगुप्ता! मी आले वासवदत्ता
तुजसाठी झुरली ती मी यौवनमत्ता
मी रूपगर्विता गणिका उरले नाही
किति कठोर तप मी आचरिले तुजकरिता

मज होते माहित, कधीतरी येशील
तू अंती आश्रय मजपाशी घेशील
ही निर्वाणाची माझी घटिका आली :
तुज कुशीत घेता 'आई' मज म्हणशील ?''

## संध्याछाया

१
ऐकलंस का सूनबाई,
घरात भरपूर ठेव तू टर्किश टॉवेल :
पावसात नाचून आलेली तुझी लेकरं
पुसतील त्यांनी आपलं अंग
तू घरी नसताना!

...असलीस तर मात्र,
त्यांना खोटं खोटं रागं भरताना
तुझ्या पदरानंच त्यांचं अंग पूस :
नाही तर त्यांच्या साठीच्या समारंभात
त्यांना तुझी आठवण व्हायची नाही!

२
शिकव बरं त्यांना तुझे म्यानर्स :
घुसड त्यांच्या कोवळ्या हातांत
चांदीचे काटेचमचे,
तुमच्या जेवायच्या टेबलावर
ठेव खुशाल चिनीमातीच्या बशा,
चिवडू देत काय पुढे ठेवशील ते!

...पण बरं का ग सूनबाई,
शेवटचे चार घास तरी
तू त्यांना तुझ्या हातानं भरव,
म्हणजे कशी जन्मभर गुटगुटीत राहतील!

३
कसली रे बँडबाजाची गाणी लावता?
आत्ता तुमची पोरं नाचतील
पण पुढं पंगू होतील, समजलात?

अरे अडगुलं मडगुलं ऐकतात
ती दिगंत कीर्तीची पंडित होतात!
निंबोणीच्या झाडामागे लपलेला चांदोबा
तापत्रयानं पोळू देत नाही!
चिऊकाऊच्या गोष्टींनी पोसलेले चक्रधर
धर्माचं प्रवर्तन करतात
तर तुमचं आपलं भलतंच!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५९२४
२६४३४
२५।५।९७
शाखा

४

तुम्ही मारे सोफा सेट मांडा,
आणि अंथरा तुमचा काश्मिरी कार्पेट...
ठेवा त्या मेजावर फुलदाण्या,
कोंबा त्यात रंगीबेरंगी फुलं...
आणि हो, तो कोपरा रिकामा राह्यलाय्
ठेवा तिथं तो टीव्हीचा खोका!
तशाच त्या पडदानशीन खिडक्या,
गच्च लावलेली दारंऽऽ...
अरे, कसे दिसणार तुमच्या पोरांना
उन्हाचे झोतच्या झोत,
आणि त्यांतनं येणारे
धुळीचे रंगीत किरण?

## सबूर

कैलास लेण्याच्या शिल्पांकित भिंतींवर
जशी लिहावीत शाळकरी पोरांनी
आपली नामाक्षरं ठिसूळ कांडीनं
आणि मानावं आपल्याला अजरामर
त्याच आविर्भावात
आम्ही मिरवतो आमचा अहंकार
काळाच्या वज्रकातळासमोर
आणि समजतो आपल्याला चिरंजीव!

एक असतो नियतीचा प्रपात
घणाघाती प्रवाहात कातळ चिरून टाकणारा,
एक असतो वारा अदृश्याचा अदृष्टाचा
ज्याच्या सपाट्यात दंडकारण्यं जमीनदोस्त होतात,
किंवा डोलत रहातात
कड्याच्या माथ्यावरची गवतफुलं नखांएवढी
मुख्य म्हणजे, भविष्यच लाव्हा होऊन
चिणून टाकू शकतं वर्तमान वज्रलेख!

शाश्वताचं मोजमाप समजल्याच्या ऐटीमधे
जे चालत असतात नश्वराच्या प्रकाशात
त्यांच्या खुब्यावरती उभारलेलं पुच्छ असतं!
ते समजावतात त्रिकालज्ञ मीमांसेनं
चिरंतन मूल्यविचार...
तेव्हा त्यांना हसत असतं सर्वसाक्षी आकाश
ज्याला दिसतात समाध्या लक्षावधी सर्वज्ञांच्या
शतकांच्या स्मशानात सर्वदूर पसरलेल्या!

कोठे आहेत समकालीन वाल्मीकिव्यासांचे ?
प्रतिभाशाली प्रतिस्पर्धी भासकालिदासांचे ?
इतिहासाचे गमक काय ? धोरण काय ? नियम काय ?
कोणते नाव वज्रलेप ? कोणते क्षणिक भासाचे ?
एक गोष्ट उघड आहे :
वर्तमान लोचनांना भवितव्य दिसत नाही,
शाश्वताचा रूपवेध नश्वरांना असत नाही !

काळ-कैलासावर खड्डू चालवणारांनो !
जरा सबूर !!

## गाणं

बरं का बाळांनो! गाणंदेखील गुंफीत चला!
व्याकरण वाचा तसं...गणीतदेखील पाहिजे थोडं,
पोथ्यासुद्धा चाळाव्या अन् जाळाव्याही कधी कधी,
अधुनमधून सहाणेवर शहाणपणही उगाळावंच,
तरीदेखील कधीतरी गाणंदेखील गुंफीत चला!

तर तुम्ही काय करा...पद्मासन घालून बसा
आणि अगदी आतल्या आत हिंदोळ्यावर झुलत असा
गाणं कसं आपोआप हाक ऐकून उडत येईल
आणि तुमच्या मनगटावर पारव्यासारखं घुमत राहील
म्हणून म्हणतो...कधीमधी गाणंदेखील गुंफीत चला!

## चित्रपट

महानगरामधला प्रकाश जेव्हा अधिक घेरीत येतो,
मी माझ्या कोशामधे आत आत बुडी घेतो!
माझ्या धमनीमधलं रक्त उलटं धावू लागतं फिरून,
फिरून एकदा भाबडे डोळे चंद्राकडे बघतात दुरून!

आणि वाटतं संस्कृतीचं वर्तुळ जेव्हा होईल पुरं,
अंगणामधे गोरजवेळी हंबरत येतील गाईगुरं!
गाडी चुकेल म्हणून तेव्हा नाडीठोका चुकणार नाही,
वेगवेड्या वादळानं नंदनवन सुकणार नाही!
शांत शांत विश्वामधे प्रत्येकाला वेळ असेल,
रानामधलं झाड दिसेल, झाडावरलं पान दिसेल!
तेव्हा ध्वनिक्षेपणाचा संगीताला शाप नसेल,
चित्रवाणीवरची राणी कशासाठी खोटं हसेल?
माझा मित्र कालिदास आपल्या तब्बेतीनं गाईल,
आळसावलेला गोड मेघ अलकेकडे संथ जाईल!
वाद होवो, युद्ध येवो, तेही खेळीमेळीत होईल,
रात्र होताच जो तो गडी तंबूत जाऊन झोप घेईल!

आज आपली अर्भकेही पढवलं तर मोहक हसतात,
आज आपली स्वप्नंदेखील वेळापत्रक पाळीत असतात!
आता सतत पुढे पुढे मानवाचा पडता पाय,
प्रलयाची काळवेळ कधी सांगून येईल काय?
युगान्ताच्या क्षणापासून पुन्हा युगारंभ असतो,
कोशामधल्या अंधारात त्याचा चित्रपट दिसतो!

## ऋणाईत

माझिया जातीचे मज भेटो कोणी ही माझी पुरवून आस,
जीवीचे जिवलग असे भेटला की दोघांचा एकच श्वास!
काय म्हणू याला...कवितारती की अक्षय सौंदर्यासक्ती,
माय मराठीच्या भक्तीने केलेली तिचिया भक्तांची भक्ती?

हे तो खरे आम्हां जडले जे वेड ते न सुटायाचे कधी,
तिने वेडे केले याचीही फिर्याद करितो कवितेमधी!
मला हे कळेना...काय तुम्हांलाही असेच लागते पिसे?
अरे कासया हे शहाणे आयुष्य तुम्ही उधळावे असे?

पोळल्या जिभेने लुळा बजावतो...बरा नव्हे बरे छंद,
अप्राप्य सौंदर्य ज्यांना हवे त्यांना सारे राजरस्ते बंद!
सोईच्या सराया टाळून जातात रानात वाटेने आड,
अशा साहसिकां कपिलाषष्ठीला भेटते अश्वत्थझाड!

याही वाटेवरी मोहाची मदिरा कांचन-कर्वंदी जाळ्या,
वाटमाऱ्यांपरी खुषमस्कऱ्यांच्या वाजती खुणेच्या टाळ्या!
चतुर चार्वाक तर्काचे परशू हातात घेऊन खडे,
हुषार हुन्नरी हातीच्या छिन्नीने पाडती आत्म्याला तडे!

अशा वाटेवरी छत्रच्छायेपरी राहता आमुच्या पाठी
राजीखुशी तुम्ही तुमची पुण्याई बांधता आमुच्या गाठी!
एकाकी हाकेला तुमच्यावाचून उत्तर कोणाचे होते?
अगा उदारांनो! तुमच्या ऋणाने आम्हांला श्रीमंती येते!

## अस्ताचल

सूर्य अस्तगिरिवरती, क्षितिजावर रंग गूढ,
वृक्षांसह पक्ष्यांसह वाराही मौनमूढ!
क्षण सरतिल चारदोन, नंतर अंधार मात्र,
सूर्यासह बुडणारच माझे अस्तित्वपात्र!
मावळत्या रंग-छटा पूर्वेवर उमटतात,
अस्ताचलिं असता मी पूर्वस्मृति प्रकटतात!
अक्षय ते पाथेयच अंतिम मम यात्रेस्तव
दिवस नवा आल्यावर जननान्तर स्मृतिवैभवं!

एक एक बीजातुन एक एक गीत नवे,
मरणातहि उरणारा तूच भाग्यवंत, कवे!

REFBK-0026434
REFBK-0026434